|| असंतोषः श्रियोर्मूलम् ||

SITARAM MHATRE FOUNDATION

Regn. No. MAHA/107/2022

Sitaram Smaran, 896, Sector 19B, Koparkhairane, Navi Mumbai - 400709

Mob: 865-735-1626 | Email: info@sitarammhatre.foundation

# प्रकल्पग्रस्तांची आत्मकथने

## प्रश्नावली व मुलाखतीच्या सर्वाधिकारांचे हस्तांतरण

*(ऑडिओ रेकॉर्डिंग सुरू झाल्याची खात्री केल्यानंतरच खालिल परिच्छेद वाचण्यास सुरूवात करावी.)*

आज तारीख आहे 06/03/2024 आणि आम्ही आहोत कोपरखैरणे गाव, नवी मुंबई मध्ये. माझे नाव आहे चंद्रकांत काळूराम म्हात्रे आणि माझ्यासोबत आहेत सौ. एकादशी काळूराम म्हात्रे, राहणार कोपरखैरणे गाव, ज्यांची मी आज सीताराम म्हात्रे फाऊंडेशन, कोपरखैरणे, नवी मुंबई द्वारा प्रकाशित "आम्ही प्रकल्पग्रस्त" नियतकालिकाच्या "प्रकल्पग्रस्तांची आत्मकथने" ह्या उपक्रमाअंतर्गत मुलाखत घेणार आहे.

**प्रश्नावली**

१. तुमचे पूर्ण नाव आणि तुमच्या गावाचे नाव सांगा.

२. ही मुलाखत रेकॉर्ड करण्यास मला तुमची परवानगी आहे का?

३. तुमचा जन्म केव्हा आणि कोणत्या गावात झाला होता?

४. जवळजवळ ५० वर्षांपूर्वी साल १९७५ च्या आसपास ठाणे व रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी नवी मुंबई शहरासाठी सिडकोने ताब्यात घेतल्या. सिडकोने जमिनी ताब्यात घेण्याआधीचा, सिडको येण्याआधीचा जो काळ होता, जी परिस्थिती होती ती कशी होती?

५. सिडकोने जमिनी ताब्यात घेण्याआधी तुमचे व तुमच्या कुटुंबियांचे उत्पन्नाचे साधन काय होते?

६. सिडकोने जमिनी ताब्यात घेतल्यानंतरच्या एक-दोन वर्षांच्या कालावधीत तुमच्या व तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नावर कशा प्रकारचा परिणाम झाला?

७. सिडकोने जमिनी घेण्याआधी स्थानिक लोकांना नोटीशी पाठवल्या होत्या. त्यावेळी तुमच्या कुटुंबात आणि आसपासच्या परिसरात त्या नोटिसींबद्दल काय प्रतिक्रिया उमटल्या होत्या?

८. सिडकोने जमिनी जेव्हा ताब्यात घेतल्या त्यावेळच्या कोणत्या विशेष घटना तुम्हाला आठवतात?

९. स्थानिकांकडून जमीन ताब्यात घेण्याची सिडकोची पद्धत कशी होती?

१०. तुमची जमीन सिडकोने घेतली ह्याचा तुमच्या मनावर व्यक्तिशः काय परिणाम झाला? **उपप्रश्न** : तुमच्या कुटुंबीयांची मानसिक अवस्था त्यावेळी कशी होती?

११. सिडकोने जमिनी घेतल्यानंतर तुमच्या परिसरात काय-काय बदल घडलेले तुम्हाला आठवतात?

१२. सिडकोआधीचं तुमचं जीवन आणि सिडकोने जमीन घेतल्यानंतरचं तुमचं जीवन ह्यात काय फरक होता?

सौ. एकादशी. का. म्हात्रे

१३. सिडकोने जमिनी ताब्यात घेण्यास येथील स्थानिक शेतकऱ्यांचा पाठींबा होता की विरोध? **उपप्रश्न** : तो त्यांनी कसा व्यक्त केला?

१४. सिडकोच्या मनमानीविरुद्ध १९८४ साली दिबा पाटिलांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी फार मोठा लढा दिला. प्रकल्पग्रस्तांच्या त्या लढ्याबद्दल तुम्हाला काय आठवते?

१५. सिडकोने तुमच्या जमिनी ताब्यात घेतल्यानंतर त्या जमिनीचा जो काही मोबदला दिला तो कशा-कशा स्वरूपाचा होता व तो कधी मिळाला?

१६. सिडकोच्या कागदपत्रांमध्ये असे नमूद केलेले आहे की त्यांनी जमिनी ताब्यात घेतल्यानंतर स्थानिक प्रकल्पग्रस्तांना शिक्षणापासून ते नोकरी-धंद्यांपर्यंत अनेक प्रकारच्या सोयीसुविधा पुरविल्या. एक प्रकल्पग्रस्त म्हणून तुम्हाला व तुमच्या कुटुंबाला यापैकी कोणकोणत्या सोयीसुविधा मिळाल्या?

१७. आज प्रकल्पग्रस्तांची जी पिढी शाळा-कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे किंवा नुकतीच कॉलेजमधून बाहेर पडली आहे त्यांना नवी मुंबईच्या ह्या जुन्या इतिहासाबद्दल फारशी माहिती नाही. नवी मुंबईच्या इतिहासाचे/च्या एक साक्षीदार म्हणून तुम्ही प्रकल्पग्रस्तांच्या ह्या नव्या पिढीला काय संदेश देऊ इच्छिता?

१८. तुम्ही आम्हाला मुलाखत देऊन नवी मुंबईच्या आजवर न लिहिल्या गेलेल्या इतिहासात एका नवीन अध्यायाची भर घातली आहे. त्याबद्दल समस्त प्रकल्पग्रस्त समाज आपला सदैव ऋणाईत राहील. जाता-जाता आमची एक नम्र विनंती आहे : आमच्या "प्रकल्पग्रस्तांची आत्मकथने" ह्या उपक्रमासाठी आवश्यकता पडल्यास आपण आम्हाला पुन्हा मुलाखत द्याल का?

---

## मुलाखतीच्या सर्वाधिकारांचे हस्तांतरण

आम्ही, मुक्तादर्शी काळुराम म्हात्रे व, राहणार सीताराम स्मरण, घर क्र. ८९६, कोपरखैरणे गाव, नवी मुंबई, व चंद्रकांत काळुराम म्हात्रे, राहणार सीताराम स्मरण, घर क्र. ८९६, कोपरखैरणे गाव, नवी मुंबई लिहून देतो की आज दिनांक 06/03/2024 रोजी कोपरखैरणे येथे घेतलेली उपरोक्त मुलाखत व तीची भाषांतरे आणि सोबत पाठवलेली मुलाखतीतील मजकुराशी संबंधित कागदपत्रे व फोटो यांच्या प्रकाशनाचे व संग्रहणाचे सर्वाधिकार, मुलाखतीच्या कॉपीराइट्स आधिकारांसहीत, आम्ही स्वखुशीने **सीताराम म्हात्रे फाऊंडेशन, कोपरखैरणे, नवी मुंबई** ह्यांना विनामोबदला देत आहोत.

सौ. मुक्तादर्शी का. म्हात्रे
मुक्तादर्शी काळुराम म्हात्रे

चंद्रकांत काळुराम म्हात्रे

K. V. Mhatre
for अध्यक्ष
**सीताराम म्हात्रे फाऊंडेशन**
कोपरखैरणे, नवी मुंबई

SITARAM MHATRE FOUNDATION
KOPARKHAIRANE, NAVI MUMBAI